संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# दहशतवादविरोधी लढ्याची ही सुरुवात ठरावी

**पुलवामा** हल्ल्याचा बदला केव्हा आणि कसा घेतला जाणार याची संपूर्ण देशाला प्रचंड उत्सुकता होती. परंतु हल्ला झाल्यानंतरच्या बाराव्या दिवशी अतिशय योजनापूर्वक पाकिस्तानच्या बालाकोट परिसरातल्या जैश ए मोहम्मदच्या केंद्रावर भारतीय वायुसेनेने हल्ला केला आणि त्यात दोनशे अतिरेकी ठार झाल्याचा भारताने दावाही केलेला आहे. पहाटे पावणेचारच्या सुमारास हा हल्ला झाला आणि सकाळी साडेसातच्या सुमारास हवाई हल्ल्याचीही बातमी हवेच्या वेगाने देशभर पसरली. लोकांमध्ये उत्स्फूर्तपणे भारत माता की जय अशा घोषणाही ऐकायला मिळाल्या. अनेक दिवसांपासून पाकिस्तान विरुध्द प्रत्येक भारतीयाचे रक्त सळसळत होते. त्याला कुठेतरी काही प्रमाणात शांत करण्याचा प्रयत्न या हल्ल्यामुळे झाला आहे. अर्थातच ज्या वेगाने आणि शिताफीने हल्ला करून भारतीय सैनिक सुखरूपपणे परत आले ते पाहिल्यावर भारतीय लष्कराच्या नियोजन आणि अभ्यासाचाही अभिमान वाटू लागतो. खरे तर पुलवामा येथे आत्मघातकी हल्ला झाल्यानंतर भारताने पाकिस्तानला स्पष्ट शब्दात बजावले होते आणि याचा पुरेपूर बदला घेतला जाईल असा कडक इशाराही दिला होता. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी लष्कर अधिक सावध आणि दक्ष असेल अशी कोणाचीही सहजपणे समजूत होईल. परंतु भारतीय हवाई दलाची विमाने दीडशेकिलोमीटर आत घुसून हल्ला करून परत येतात आणि त्याचा पाकिस्तानी सैन्याला सुगावा लागू नये.हे आणखीनच आश्चर्यकारक ठरते. आपल्या हद्दीची किंवा सीमेची पाकिस्तान किती काळजी घेते हे यावरून सिध्द होते. उलट या सीमावर्ती भागात पाकिस्तानी लष्करापेक्षाही दहशतवाद्यांचाच जास्त धुमाकुळ दिसून येतो. पाकिस्तानी सैन्याच्या रडारला चुकवून घुसलेली ही विमाने हल्ल्याची एक झलक ठरते. जे भारताने पूर्ण ताकदीनिशी किंवा युध्द करण्याचा निश्चय केला तर पाकिस्तानची काय अवस्था होईल वेगळे सांगायला नको. कारगिलच्या काळातील परिस्थिती आणि आताची भारतीय सैन्याची ताकद यामध्ये जमीन आसमानाचा फरक पडलेला आहे. गेल्या पंधरा वर्षामध्ये भारतीय लष्कराचे झालेले आधुनिकीकरण किंवा शस्त्रास्त्रांची वाढवली गेलेली खरेदी भारताला सशक्त करणारी ठरते. या हल्ल्यानंतर पाकिस्तान काय प्रत्युत्तर देते याकडेदेखील देशाचे लक्ष लागून आहे. पुढचे काही महिने हे अशाच युध्दसदृश्य परिस्थितीसारखे असतील असे म्हणायला हरकत नाही.

### रात्र वैऱ्याची आहे

भारताने हा हल्ला केल्यानंतर पाकिस्तानमध्ये बराच गोंधळ उडाल्यासारखी परिस्थिती आहे. सामान्य माणूस काहीसा भेदरलेला तर आहे तर तिथले सरकार आणि लष्करही निश्चित निर्णय घेण्याच्या क्षमतेमध्ये दिसत नाही. अर्थातच लष्कर आणि दहशतवादी या दोघांच्याही कचाट्यात पाकिस्तानी सरकारला राहावे लागते. ही आज वस्तुस्थिती आहे की पाकिस्तान स्वतः या हल्ल्याला प्रत्युत्तर देईल अशी शक्यता दिसत नाही. ते पुन्हा एकदा अशाच आत्मघातकी हल्ल्यांच्या माध्यमातून बदला घेण्याचा प्रयत्न करेल. यापूर्वी झालेल्या सर्जिकल स्ट्राईकनंतर पाकिस्तानने कोणताही मोठा प्रतिकार केला नव्हता. उलट जैश ए मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझरने भारताला इशारा दिला होता का, सर्जिकल स्ट्राईक कसा असतो हे आम्ही भारताला समजावू आणि दोन वर्षांनंतर त्यांनी घडवलेला पुलवामा हल्ला हा त्याच जैश ए मोहम्मदने घडवून आणला. हे देखील लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थ याही हल्ल्याचा बदला पाकिस्तान दहशतवाद्यांच्याच माध्यमातून घडू शकतो. याकरीता पुढच्या काळामध्ये भारताच्या सर्व सुरक्षा यंत्रणांना अतिदक्ष म्हणजेच हाय अलर्टच राहावे लागेल किंबहुना आता खऱ्या अर्थाने रात्र वैऱ्याची आहे सतत सावधान राहाण्याशिवाय भारताला पर्याय नाही. यानिमित्ताने भारताला आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल, की आपण अशा प्रकारचे छोटे मोठे हल्ले करतो आणि त्याचाही लागलीच विजयोत्सवही साजरा करतो प्रतिहल्ल्याचा आनंद वाटणे स्वाभाविक आहे. परंतु आपण या सगळ्या प्रकाराकडे हल्ल्यावरचा प्रतिहल्ला एवढ्याच दृष्टीकोनातून पाहात आलो. वस्तुतः तो दहशतवादविरुध्दचा प्रदीर्घ काळ लढावा लागणारा लढा आहे. हे आपण विसरतो. इस्त्रायलने त्यांच्या देशातील पॅलेस्टिनी दहशतवाद मोडून काढण्याकरीता तब्बल वीसवर्षे लढा दिला एवढेच नव्हे तर अमेरिकेतल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्याचा अजूनही बदला घेत आहे. हल्ल्याच्या नऊ वर्षांनंतर त्यांनी ओसामा बिन लादेनला याच पाकिस्तानात शोधून काढले आणि ठारही केले.

### भावनिक आनंद आणि वस्तुस्थिती

याच पध्दतीचा हा दहशतवादाविरुध्दचा हा लढा भारताला पाकिस्तानशी प्रदीर्घ काळ लढावा लागेल. म्हणूनच याच्याकडे केवळ प्रतिहल्ला म्हणून न पाहाता दहशतवादविरोधी लढ्याची खऱ्या अर्थाने झालेली सुरुवात आहे. याच दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे किंवा भारताने त्याचे वर्णनही तसेच केले पाहिजे. तरच पाकिस्तानला हे कळून चुकेल की आता भारताने आपल्याबरोबरचे युध्द छेडलेले नाही तर आपण पोसत असलेला दहशतवाद मोडून काढण्याकरीता दीर्घकालीन लढा सुरु केलेला आहे. दुर्दैवाने आपल्या देशात देशभावनेचा तात्पुरता आवेश निर्माण होतो. राजकीय पक्ष त्याचाही गैरफायदा उठवण्याचा प्रयत्न करतात आणि आपले जे मूळ संकट आहे त्याकडे पुन्हा दुर्लक्ष होत राहाते. म्हणूनच भारताने केलेला हा हवाई हल्ला केवळ आनंद साजरा करण्याचा किंवा पाकिस्तानला आपण फार मोठा धडा शिकवला. अशा समजूतीत राहाण्याचा नाही. तर गेल्या चाळीस वर्षांपासून ज्या शेकडो जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले आणि काश्मिरसारखे नंदनवन या दहशतवादात होरपळत राहिले. त्याला पूर्णविराम देण्यासाठी लढा सुरु झाल्याचेच सर्वांनी समजले पाहिजे. विशेषतः सरकारने अशा प्रकारचा निर्धार बोलून दाखवला पाहिजे यापुढे एकाही जवानाचा बळी जाणार नाही आणि दहशतवाद शिल्लक राहाणार नाही अशीच भविष्यातील योजना असली पाहिजे.